# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०४.०१.२००५ रोजी (दि.२०.१२.२००४ ची तहकूब सभा)संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक ०४.०१.२००५ रोजी (दि.२०.१२.२००४ ची तहकूब सभा) मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘ प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘ येथे दुपारी १२.१५ वाजता ‘‘ वंदेमातरम् ‘‘ या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
०९. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
१०. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
११. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१४. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१६. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१९. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
२०. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२३. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२५. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२६. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२८. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२९. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

३०. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३१. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३२. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३३. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३४. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान
३५. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३६. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३७. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३८. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३९. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
४०. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
४१. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
४२. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४३. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४४. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४५. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
४६. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४७. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४८. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४९. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
५०. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
५१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५२. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
५३. स.स.श्री.राधाकृष्ण राजाराम गायकवाड
५४. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५५. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५६. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५७. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५८. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५९. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
६०. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
६१. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६२. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६३. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६४. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६५. श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६६. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६७. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६८. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६९. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
७०. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७१. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज

७२. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

०२. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे

०३. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर

०४. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

०५. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

<u>संवाद :</u>

श्री.स.अली सलामी : भारताचे माजी पंतप्रधान स्व.श्री.पी.व्ही.नरसिंहराव यांचे नुकतेच दु:खद निधन झाले, त्यांना,पॅलेस्टिन नेते यासेर अराफात यांना तसेच नुकताच काही दिवसापूर्वी प्रलयकारी भूकंप झाला, त्यात अनेक लोकांचा बळी गेला, अशा सर्व मृत्यु झालेल्यांना या सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.भागवत कराड : तसेच सिने कलाकार लक्ष्मीकांत बेर्डे व सामाजिक कार्यकर्ते श्री.बाबुराव नरवडे

श्री.किशनचंद तनवाणी यांचे वडील नाथाजी नरवडे यांचे निधन झाले व तसेच प्रसिध्द व्यापारी स्व.सुरेश टिबडीवाला यांचेही दु:खद निधन झाले, त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भागवत कराड : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : श्री.यासेर अराफात यांना श्रध्दाजंलीतून वगळावे.

श्री.स.अली सलामी : यासेर अराफात यांना देखिल श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

(याचवेळी सभागृहातर्फे ०२ मिनीटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री.सुरजितसिंग खुंगर : आजची सभा ही गेल्या २० तारखेलाच आयोजीत करण्यात आलेली होती त्यावेळी इतिवृत्त देण्यात आलेले नाही. आजपर्यंत इतिवृत्ताची प्रत देण्यात आलेली नाही. त्या इतिवृत्तात कोणते प्रस्ताव मंजूर झालेले आहे. ऐनवेळी का घेतले. व मंजूर केले इतिवृत्ताची प्रत देण्यात यावी. का इतिवृत्त वाटप करण्यात आलेले नाही.खुलासा व्हावा.

श्री.मीर हिदायत अली : हज यात्रेसाठी या शहरापासून विमानाने डायरेक्ट जाण्याची व्यवस्था झालेली आहे. यासाठी मा.श्री.राजेंद्र दर्डा तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे श्री.प्रफुल्ल पटेल यांनी परिश्रम घेऊन ही सुविधा उपलब्ध करून दिली त्या बध्दल त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्याचा ठराव पास करावा.

श्री.सुरजितसिंग खुंगर : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.पांडूरंग तायडे : मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व मा.श्री.शरद पवार या दोन्ही नेत्यांनी एकत्रीत येऊन या शहरापासून डायरेक्ट हज यात्रेसाठी जाण्याकरीता लक्ष घालून व्यवस्था केली, त्यांचेही अभिनंदन करण्यात यावे.

श्री.रतनकुमार पंडागळे : अभिनंदन करावे. आपण आता चर्चेला सुरूवात केलेली आहे. चर्चा करण्यास संधी दिलेली आहे.

श्री.भगवान घडमोडे : आमदार श्री.राजेंद्र दर्डा यांनी लोक प्रतिनिधी म्हणून काम केलेले आहे. अभिनंदन ठराव घेण्याची गरज नाही. केंद्र शासनाने यापूर्वी त्यास मान्यता दिलेली होती म्हणून व्यवस्था झाली कोणी कुणावर उपकार करीत नाही.

श्री.रतनकुमार पंडागळे : चर्चेला सुरूवात झालेली आहे. या शहराचे आपण प्रथम नागरीक आहात एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत आहात. महापालिकेच्या

अधिकाऱ्याबद्दल आपण आरोप केले. आपणांकडे अशी माहिती आली असेलच म्हणून आरोप केले आहे. नांवे जाहीर करावे. आपण शासनास पत्र दिले. सर्व वृत्तपत्रात प्रसिध्दी झाली. सुज्ञ नागरीक सुध्दा विचार करू लागले. कोणते अधिकारी आहे, आपल्याकडे माहिती प्राप्त झाली असेल त्यांची नांवे जाहिर करावी, अशी विनंती आहे.

श्री.किशनचंद तनवाणी : आताच स.सदस्य श्री.पंडागळे यांनी सूचना केली. हा विषय सभागृहाचा होत नाही. चर्चा करू नये. अशी सर्वांना विनंती करतो. शहराच्या विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी अशी विनंती करतो.

श्री.सुनिल मगरे : हा विषय महापौर यांच्या संबंधीत आहे.

मा.महापौर : हा विषय सभागृहाचा होत नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री.प्रकाश निकाळजे : अधिकाऱ्यावर मा.महापौर यांनी आरोप केलेले आहे. ते काही अंशी खरे असू शकेल. वाईट बोलले नाही. मा.महापौरांनी अधिकाऱ्याचे पितळ उघडे पाडले. हा विषय या सभागृहाचा नाही असे गृहीत धरले तरी मा.महापौरांचे नावाने सर्व वृत्तपत्रात छापून आले जे भ्रष्ट अधिकारी असतील त्यांचे धाबे दणाणले असतील. त्यांची यादी व कोणत्या कामात त्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे, याचा सविस्तर तपशिल जनते समोर मांडावा. या आरोपामूळे जे अधिकारी प्रामाणिकपणे काम करतात त्यांचे मनोधैर्य खचलेले आहे. या संस्थेचे नगरसेवक हे विश्‍वस्त आहेत. त्यांचे सोबत काम करतात त्यांना पाठबळ देणे नैतिक कर्तव्य आहे. जे अधिकारी कामचूकारपणे कामे करतात, अशावर कार्यवाही होणे आवश्यक आहे. यात शंका नाही. आपण केलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्याच्या बाबतीत आरोप त्यांची नावे वाचून दाखवावी नसता केलेले आरोप चूकीचे आहे, म्हणून दिलगीरी व्यक्त करावी.

मा.महापौर : हा विषय सभागृहाचा होत नाही. इतर विषयावर चर्चा करावी. विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी.

(याचवेळी मा.महापौर डायस समोर आघाडीचे स.सदस्य भ्रष्ट अधिकारी कोण यांची नांवे द्यावी,म्हणून मागणी करतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.स.अली सलामी : शासनाकडे आपण काय पत्र पाठविले त्याची माहिती वाचून दाखवावी. कोणते अधिकारी यांनी भ्रष्टाचार केला, त्यांची नांवे आम्हाला द्यावी. या विषयानंतर विकास कामाच्या बाबतीत आपण चर्चा करू. होत असलेला भ्रष्टाचार बंद झाला पाहिजे. मागील वेळेस ही सभा तहकूब केलेली होती. विकास कामाचे काही देणे घेणे कुणाला नाही. कामे होत राहतील या आरोपामूळे महापालिकेची बदनामी होत आहे. खूलासा व्हावा. चर्चा व्हावी. सभा २-३ दिवस चालवा. मागील सभा तहकूब करण्याचे कारण नव्हते का तहकूब केलेली होती.

श्री.नंदकुमार घोडेले : हा सभागृहाचा विषय नाही. विकास कामाच्या बाबत चर्चा करावी.

श्री.भगवान घडमोडे

मा.महापौर : हा विषय सभागृहाच्या बाहेरचा आहे.

श्री.सुनिल मगरे : स.सदस्य श्री.पंडागळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खूलासा करावा आपण केलेले आरोप खरे असेल तर कोणत्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला कोणत्या कामात केला, किती केला याचा खूलासा व्हावा.

श्री.नंदकुमार फुलारी : शहराचा विकास कसा होईल ते पहावे. बाकीचे प्रश्न बाजूला ठेवावे.

श्री.स.अली सलामी : या पूर्वीची सभा का तहकूब केली.५ मिनीटे उशीर झाला तर सभा तहकूब केली विकास कामाचे काही देणे घेणे नाही.

(याचवेळी मा.महापौर डायस समोर खूलासा जाहीर करावा म्हणून मोठमोठ्याने मागणी करतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.सुनिल मगरे : भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करा जबाबदारपणे खुलासा केला आहे.

मा.महापौर : हा विषय सभागृहाचा होत नाही रूलींग दिलेले आहे दूसऱ्या विषयावर चर्चा करावी. सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी.

(वेळोवेळी मा.महापौर यांनी सूचना करूनही स.सभासद जागेवर बसत नाही. मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.स.अली सलामी : प्रशासनास आपण नविन मोटार वाहन मागणी केलेली होती. ते प्रशासनाने नाकारले म्हणून आपण आरोप केले असे वृत्तपत्रात आलेले आहे हे सत्य आहेत का? आरोप केले असेल अधिकाऱ्यांचे चारित्र्य हनन हा खाजगी विषय होऊ शकत नाही. खूलासा करण्यात यावा.

मा.महापौर : सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.सुनिल मगरे : आपण केलेले आरोप एक तर त्या अधिकऱ्यांची नांवे जाहिर करावी, नसता दिलगिरी व्यक्त करावी.

(विकास कामाचे कूणाला देणे घेणे नाही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे त्यांची नांवे जाहिर झालीच पाहीजे अशा घोषणा देतात. मोठमोठ्याने स.सभासद बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री.संजय शिरसाठ : चांगला मुद्दा स.सदस्यांनी उपस्थित केला. नागरीकापर्यंत स्टेटमेंट गेले. शासनास पत्र दिले असेल तर अहवाल समोर येईल नंतर चर्चा करता येईल.

श्री.किशनचंद तनवाणी : हा विषय सभागृहाचा नाही. सर्व स.सभासदांना विनंती की, विकास कामाच्या संदर्भात चर्चा करावी.

सौ.लिलावती घायतिलक : महापौर-उपमहापौर महिला आहेत. महिलांचे प्रश्न सोडवले जात नाही.

श्री.तकीहसन खान : ही तहकूब सभा आहे, आता पून्हा तहकूब करू नये सभेचे कामकाज व्हावे. सभागृहात उपस्थित झालेल्या मुद्द्याचा खूलासा होणे आवश्यक आहे. सभा तहकूब केली तर कुण्याही सदस्य खूर्चीवर बसवून सभा होईल.

सौ.लिलावती घायतिलक : माझ्या वार्डातील विकास कामे अर्धवट आहेत, का बंद ठेवली खूलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे : मा.महापौर यांनी शासनास पत्र दिले. शासनाने महापालिका प्रशासनास अहवाल मागविलेला आहे. या बाबत चौकशी होईल त्या नंतर चौकशीचा अहवाल येईलच.नियमित पूढे सभेचे कामकाज चालू करावे.

श्री.भागवत कराड : गेल्या ४-५ वर्षात या सभागृहात अनेक स.सदस्यांनी अधिकाऱ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहे. बरेच अनधिकृत वसाहतीत कामे होत नाही. जरी मा.महापौर यांनी पत्र देऊन आरोप केले असतील तर चौकशी अहवाल समोर येईलच. महापालिकेची अनेक विकास कामे बाकी आहे. त्यावर चर्चा करावी.

श्री.नंदकुमार घोडेले : विकास कामाच्या संदर्भात चर्चा सोडून इतर विषयावर चर्चा करण्यास स.सभासद हट्ट धरत असतील तर योग्य नाही. व यामूळे सभा तहकूब करावी लागत असेल तर बरोबर नाही. वादग्रस्त विषय या सभागृहात उपस्थित होऊ नये असे माझे मत आहे.

श्री.पांडूरंग तायडे : मा.महापौर यांना नविन गाडी (वाहन) न घेऊ दिल्यामूळे आरोप केलेले आहे, असे वृत्तपत्रात आलेले आहे. जे भ्रष्ट अधिकारी असतील त्यांची नांवे जाहिर

करावी. व त्यांचेवर कठोर कार्यवाही सुध्दा होणे अपेक्षित आहे. आपण केलेल्या आरोपामूळे शहरात महापालिकेची बदनामी झालेली आहेत.

श्री.स.अली सलामी : जे आरोप प्रत्यारोप होत आहे या बाबत खूलासा व्हावा. यापूर्वीही जे आयुक्त येथे आले, त्यांना जास्त दिवस सेवा करू नये, म्हणून हे प्रकार सुरू होतात. शासनास जे पत्र आपण पाठविले त्यात मा.आयुक्त व इतर अधिकारी हे भ्रष्ट असल्याचे नमूद केलेले आहे. अशी माहिती मिळाली. स्पष्ट खूलासा होत नाही तो पर्यंत सभेचे कामकाज होऊ देणार नाही. कोणकोणत्या अधिकाऱ्याबद्दल आरोप केले. एका बाजूने सभापती सांगतात मा.आयुक्त चांगले काम करीत आहेत तर आपण पत्र देवून आरोप करतात हे संयूक्तीक वाटत नाही.

सौ.लिलावती घायतिलक : माझे प्रश्न तसेच राहतात, गोंधळ होतो. माझे प्रश्न सोडू दिल्या शिवाय सभा होवू देणार नाही.

श्री.रतनकुमार पंडागळे : या वर्षामध्ये ज्या कामाची नोंदणी केली होती, जी अर्थ संकल्पात नमूद आहे. त्या कामांना गती मिळालेली आहे. जवळपास १२७८ कामाच्या संदर्भात मी बोलू इच्छितो जवळपास नमूद केलेल्या कामापैकी ९०% कामांची वर्कऑर्डर निघालेल्या आहेत. महापालिकेच्या उत्पन्नात सुध्दा वाढ झालेली आहे.

श्री.स.अली सलामी : मा.महापौर यांनी जे पत्र पाठविले त्या संदर्भात अगोदर खूलासा करण्यात यावा, विषय बदलत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : या सभागृहामध्ये जवळपास दोन महिन्यानंतर चर्चा होत आहे. जेष्ठ स.स.श्री.पंडागळे यांनी मत व्यक्त केले की, अर्थसंकल्पातील बरीच कामे झालेली आहे. ती कामे होणे आवश्यक आहे. त्या विषयावर सविस्तर चर्चा करावी. जे काही विषय असतील त्या सर्व विषयावर चर्चा करण्यात यावी. कोणीही गोंधळ करू नये विकास कामाच्या संदर्भात बैठक आयोजीत केलेली आहे. जे जे विषय, विषय पत्रिकेवर असतील त्यावर सविस्तर चर्चा व्हावी.

श्री.तकीहसन खॉन : मा.महापौर यांनी केलेले आरोपा बाबत अगोदर खूलासा करावा. त्यानंतर इतर चर्चा व्हावी.

सौ.लिलावती घायतिलक : महिला महापौर असतांना महिलांचे काम होत नाही, माझ्या वार्डात लाईटची व्यवस्था नाही. दिवाळी पूर्वी पत्र दिले कार्यवाही झालेली नाही. रस्त्यावर असलेले लाईटचे पोल बाजूला करण्याची कार्यवाही झालेली नाही महापालिकेने त्यासाठी एम.एस.ई.बी.ला ५६०००/- रू.चा चेक दिलेला आहे, कार्यवाही झालेली नाही.

श्री.सुरजितसिंग खुंगर : मागिल सभेचे इतिवृत्त का देण्यात आलेले नाही, कोणते प्रस्ताव त्यात टाकरण्यात आले, खूलासा द्यावा.

सौ.लिलावती घायतिलक : माझ्या वार्डात एक मजूर काम करीत असतांना मृत्यु झालेला असून त्यास दोन वर्ष झालेली आहे. अनेक वेळा पत्र दिले त्या व्यक्तीच्या पत्नीला नोकरी देत नाही, कारण काय? तसेच त्या व्यक्तीच्या पत्नीला महापालिका सेवेत सामावून घेतले जाईल म्हणून मा.महापौर, उपमहापौर,मा.आयुक्त यांनी आश्वासन दिले तसेच या सभागृहात ठराव ही पास केला त्या ठरावास काही महत्व नाही का? प्रस्ताव शासनास पाठविलेला आहेत का पाठविलेला असेल तर काय चौकशी आतापर्यंत झालेली आहे. कालच्या ३ तारखेला २ वर्ष झाली, परंतू कोणतीच दखल प्रशासनाने घेतलेली नाही. तसेच या महापालिकेच्या सेवेत जे अस्थायी कर्मचारी काम करतात, त्यांना किती वर्षानंतर कायम केले जाते, नियम काय आहे, काही २०-२० वर्षापासून दैनिक वेतनावर काम करीत आहे.

श्री.स.अली सलामी : आताच स.सदस्या सौ.घायतिलक यांनी त्यांचे वार्डातील विकास कामाच्या संदर्भात प्रश्न केला. खर्च होणारा निधी योग्य पध्दतीने होत नाही. हा प्रश्न नंतर उपस्थित केलेला असून त्या अगोदरच्या विषयावर खूलासा करण्यात यावा. भ्रष्टाचाराची बाब येते. विकास कामे होत नाही. शासनास पत्र दिले, काय दिले त्याचा खूलासा व्हावा. यामूळे महापालिकेची बदनामी झालेली आहे. ए.सी.एन. वर ईटीव्ही,झी टीव्ही वर सुध्दा प्रसिध्दी झालेली आहे, महापालिकेची बदनामी झाली. ते बंद झाले पाहीजे.भ्रष्टाचाराचा मुद्दा पहिल्यांदा चर्चेला घ्यावा. नंतर इतर विषयावर चर्चा करता येईल.आमची बैठक काही महिन्यापासून व्यवस्थित होत नाही. एकानंतर एक विषय घ्या. सभा ३ दिवस चालू द्या. भ्रष्टाचाराचा मुद्दा महानगरपालिकेशी संबंधीत आहे. महापौर दालनातून पत्र गेले. काय पत्र पाठविले त्याचा खुलासा व्हावा. विकास कामासाठी पहिल्यांदा भ्रष्टाचाराचा मुद्दा घ्या.

सौ.लिलावती घायतिलक : मी ठराव दिलेला आहे की, सन २००४ मध्ये जे कर्मचारी कायमस्वरूपी करण्यात आले, त्यायादीतील दैनिक वेतनावरील काही कर्मचारी मृत्यु पावलेले होते, त्यांची जागा रिक्त ठेवून त्या व्यक्तीच्या कुटूंबीयातील व्यक्तींना संधी द्यावी असे पत्र दिले होते, त्याचा विचार झालेला नाही.

मा.महापौर : संबंधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

श्री.सुनिल मगरे : भ्रष्ट अधिकारी कोण आहे, यादी जाहीर करावी. त्यावर अगोदर चर्चा करावी.

सौ.लिलावती घायतिलक : माझ्या प्रश्नाचा खुलासा करावा. नसता मी आत्मदहन करेल.

उपआयुक्त (प्र.) : जे दैनिक वेतनावर कर्मचारी होते व मृत्यु झालेले आहे, त्या संदर्भात शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभेचा ठराव आहे, त्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री.पांडूरंग तायडे : जे अधिकाऱ्यावर आरोप केले, त्या अधिकाऱ्यांची नांवे जाहीर करावी.

श्री.नंदकुमार घोडेले : विरोधक पक्षाचे सदस्य आजची सभा होऊ द्यायची नाही, म्हणून ठरवून आलेले आहे शंका येते. चर्चा होवू देत नसेल तर सभा घेवू नये.

(याचवेळी डायस समोर जावून स.सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.सुनिल मगरे : एक तर नांवे जाहीर करावे किंवा राजीनामा द्यावा. त्यांचेवर कार्यवाही करा. आम्ही तुमचे अभिनंदन करतो.

श्री.संजय शिरसाठ : एक विरोधी पक्षातील काही सदस्य खुलासा करावा, व काही सदस्य खूलासा करू नये असे म्हणतात सर्वच एकावेळी बोलतात. नेहमी विरोधी पक्षातील स.सदस्यांची एखाद्या विषयावर खुलासा करण्याचा हट्ट असतो व सभा होत नाही तहकूब होते. आपण केलेले स्टेटमेंटचा त्यांनी खूलासा मागविला. एक तर खूलासा करावा, चौकशी चालू असतांना नांवे जाहीर करता येणार नाही. नसता चर्चा घ्यावी किंवा विषय पत्रिकेस सुरूवात करावी. मा.महापौर यांनी प्रधान सचिव यांना तक्रार केली. प्रधान सचिवांनी मा.आयुक्त यांना अहवाल मागविलेला आहे. तो ते दतील. त्यानंतर आपणांस चर्चा करता येईल. जाणीव पूर्वक विरोधी पक्षाला सभागृह चालू द्यायचे नाही.

श्री.स.अली सलामी : सभागृहात आम्हाला खुलासा अपेक्षित आहे. पत्र काय दिले वाचून दाखवावे.

श्री.प्रशांत देसरडा : कोणतीही चौकशी चालू असतांना नांवे जाहीर करता येणार नाही. चौकशी करण्यास अडथळा निर्माण होवू शकतो. नांवे जाहीर करू नये.

(स.स.श्री.शे.मुनाफ राजदंडा जवळ येवून राजदंड पकडतात व थोड्याच वेळात परत आपल्या जागेवर जातात)

मा.महापौर : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसून प्रश्न विचारावेत.

श्री.स.अली सलामी : विरोधी पक्षाचे लोक बसूनच बोलत होते. तूमचे लोक गोंधळ करतात.

श्री.नासेरखान अ.रहेमानखान : सर्वांना माहित आहे, भ्रष्ट अधिकारी कोण आहे. चौकशी होण्या अगोदर नावे जाहीर केले तर अधिकाऱ्यांना मिळून घेवून काही करू शकतात. महिला महापौर आहे, म्हणून दबाव आणून मागणी करतात हे कदापी सहन करणार नाही.

श्री.स.अली सलामी : एक शिक्षण सभापती असे बोलतात बरोबर नाही. यापूर्वी अनेक चौकशी समिती नियूक्त केलेल्या आहे. काहीही कार्यवाही होत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : विषय क्र.१ ते ६ मंजूर करावे, सभा संपवावी.

(सभागृहात जोरजोराने बोलणे चालूच असते.)

श्री.किशनचंद तनवाणी : ऐनवेळचे प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावे.

मा.महापौर : विषय क्र.१ स्थगीत ठेवून उर्वरीत सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे, ऐनवेळचे २ प्रस्ताव मंजूर करण्यात येते.

**विषय क्र. ५१३/१ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना एप्रिल १९९८ मध्ये महानगरपालिका औरंगाबाद मध्ये हस्तांतरीत झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दोन उप अभियंता (एक स्थापत्य व एक यांत्रिकी ), सहा कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (चार स्थापत्य, एक यांत्रिकी, एक विद्युत) सुध्दा एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर महानगरपालिका सेवेमध्ये घेण्यात आले होते. सदर योजनेचा व्याप व कार्यभार पाहता सदरील अभियंत्यांना सन १९९८पासून आता पर्यंत प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेतर्फे ठेवण्यात आले आहे. या वर्षी सन २००४ च्या उन्हाळ्यातील आपत्कालीन परिस्थितीमुळे सदरील अभियंत्यांना दिनांक २०.०७.२००४ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्व साधारण सभेच्या विषय क्र.३६८/३ अन्वये पुढील काळासाठी प्रतिनियुक्ती कालावधी वाढवून देणे बाबत ठराव पारीत झालेला आहे. या ठरावानुसार खालील प्रमाणे सदरील अभियंत्यांना प्रतिनियुक्तीची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. श्री.एस.पी.ढवळे | शाखा अभियंता,स्थापत्य | दि.३०.०६.२००५ पर्यंत |
| २. श्री.आर.ए.गोसावी | कनिष्ठ अभियंता, स्थापत्य | ----‘---- |
| ३. श्री.एन.बी.वाघमारे | शाखा अभियंता,स्थापत्य | ----‘---- |
| ४. श्री.डी.आर.गवई | शाखा अभियंता, यांत्रिकी | ----‘---- |
| ५. श्री.सी.एल.राठोड | कनिष्ठ अभियंता, विद्युत | ----‘---- |
| ६. श्री.के.पी.धांडे | शाखा अभियंता, स्थापत्य | दि.०८.०६.२००६ पर्यंत |

उपरोक्त सहा अभियंत्यापैकी श्री.आर.ए.गोसावी व श्री.के.पी.धांडे यांनी महानगरपालिका सेवेमध्ये कायमस्वरूपी समावेश व्हावा म्हणून विनंती अर्ज दिलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीच्या आदेशातील अटी व शर्ती मध्ये अट क्र.१८ अन्वये अशा प्रकारच्या कायमच्या समावेशाची तरतुद आहे. सदरील दोन्ही अभियंत्यांनी खालील मुद्यांच्या अधिन राहून महानगरपालिकेमध्ये कायम स्वरूपी समाविष्ठ होण्याची तयारी दर्शविली आहे.

१. श्री.आर.ए.गोसावी हे कनिष्ठ अभियंता म्हणून दिनांक २५.०९.१९९५ रोजी व श्री.के.पी.धांडे हे कनिष्ठ अभियंता म्हणून दिनांक १४.०३.१९९१ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये (पुर्वीचे परिसर अभियांत्रिकी) रूजू झाले तेंव्हा पासुन त्यांची सेवा जेष्ठता महानगरपालिकेच्या अस्थापनेवर ग्राह्य धरावी व पुढील सर्व पदोन्नतीसाठी निवड सुची मध्ये उपरोक्त दिनांका पासुनचा त्यांचा सेवा-कालावधी ग्रहीत धरावा.

२. त्यांचे चालू वेतन अबाधीत ठेवण्यात यावे, म्हणजेच सध्याच्या वेतन श्रेणीनुसार पुढील पगारवाढ व अनुषंगिक फायदे देण्यात यावेत.

३. श्री.आर.ए.गोसावी यांची सन २००० मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर पाच वर्ष सेवा पुर्ण झाल्यामुळे, तसेच ते कनिष्ठ अभियंत्यांची व्यावसायीक परिक्षा उत्तिर्ण असल्यामुळे त्यांना सन २००० पासुन शाखा अभियंता या पदाचा दर्जा व वेतनश्रेणी आर्थिक फायद्यासह देण्यात यावा.

४. श्री.के.पी.धांडे हे दिनांक ३१.०८.२००१ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या पुर्व परवानगीने स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परिक्षा विषेश प्राविण्यासह उत्तिर्ण झाले आहे. त्यामुळे त्यांना दिनांक १४.०३.१९९१ पासुनच्या एकुण सेवेच्या ३/८ सेवा काळ सहाय्यक अभियंता म्हणून द्यावा व महानगरपालिकेच्या सहाय्यक अभियंत्यांच्या एकत्रित जेष्ठता सुचीत त्याप्रमाणे समावेश करून महानगरपालिकेतील पुढील पदोन्नतीसाठी त्यांच्या ३/८ सेवा व पदवीचा विचार व्हावा.

५. महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेले निवृत्ती वेतन व इतर अनुषंगीक फायदे ते दोघे ज्या दिवशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये रूजू झाले तेंव्हा पासुन देण्यात यावे.

६. वरील काळात शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले फायदे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्यांना मिळावेत.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ द.ल.ली. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथे चार संतुलन टाक्या (७.५ ते ७५ लाख लिटर्स क्षमा,) तेथुन १४०० मी.मी. व्यासाची शहरापर्यंत पी.एस.सी.ची मुख्य जलवाहिनी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने टाकलेली नक्षत्रवाडी ते सिडको एक्सप्रेस जलवाहीनी (जी येणाऱ्या काळात महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणार आहे.) इ.मोठ मोठी उपांगे अंतर्भूत आहे. ही सर्व कामे उपरोक्त अभियंत्या मार्फतच जायकवाडी उप विभागाद्वारे पाहण्यात येतात शहराची पाण्याची वाढीव मागणी गृहीत धरता रूपये ६७.३० कोटी किमंतीची मंजूर योजने पैकी टप्पा क्र.१ ची कामे करणेसाठी निविदा प्रक्रिया पुर्ण केली असून, टप्पा एक अंतर्गत रूपये ७१४.०० लक्ष किमंतीचे कामही लवकरच सुरू होत आहे. यासाठी अनुभवी अभियंते महानगरपालिकेस आवश्यक आहेत. श्री.एस.पी.ढवळे, शाखा अभियंता, श्री.एन.बी.वाघमारे, शाखा अभियंता, श्री.डि.आर.गवई, शाखा अभियंता,श्री.सी.एल.राठोड, कनिष्ठ अभियंता हे येणाऱ्या मे २००५ मध्ये त्यांच्या मुळ खात्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये परत जाणार आहेत. वास्तविक पाहता योजना यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीकोनातून उपरोक्त सर्व अभियंत्यांनी महानगरपालिका सेवेमध्ये कायम स्वरूपी समाविष्ठ होणे आवश्यक आहे, परंतु त्यापैकी श्री.आर.ए.गोसावी व श्री.के.पी.धांडे या दोन अभियंत्यांनीच उपरोक्त उल्लेखीलेल्या अटीच्या अधीन राहून महानगरपालिका सेवे मध्ये काम स्वरूपी वर्ग होण्याबाबत लेखी संमती दिली आहे.

भविष्यात औरंगाबाद शहराची झपाट्याने होणारी वाढ, पर्यायाने लोकसंख्या वाढ, वाढती पाण्याची मागणी, मुळ स्त्रोतांमध्ये पाण्याची कमतरता, योजना व्यवस्थीत राबविण्याचे आवश्यक ते तांत्रिक ज्ञान व अनुभव, आकस्मीक उद्भवणारी आपतकालीन परिस्थिती हाताळण्याचा अनुभव इत्यादी अनेक बाबी पाहता औरंगाबाद पाणी पुरवठा योजना समर्थपणे हातळण्यासाठी व नागरिकांना विनाव्यत्यय पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने वरील दोन अभियंते श्री.आर.ए.गोसावी व श्री.के.पी.धांडे यांना महानगरपालिकेच्या सेवे मध्ये त्यांनी लिहीलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून कायम स्वरूपी समाविष्ठ करून घेणे साठी मा.आयुक्त महोदय यांनी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तरी उक्त प्रमाणे श्री.आर.ए.गोसावी व श्री.के.पी.धांडे यांनी दिलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून त्यांना कायम स्वरूपी महानगरपालिकेच्या सेवे मध्ये समाविष्ठ करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री.नंदकुमार घोडेले : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

मा.महापौर : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ५१४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वरदगणेश ते सावरकर चौकापर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक रू.२४,८९,२२१/- चे तयार करण्यात आलेले आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश रू.१६७ कोटी औरंगाबाद एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमात करण्यात आलेला आहे. परंतु महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सदर रस्ता बांधणी बाबत अजुन कार्यवाही झालेली नाही. तसेच या कामाचे प्राधान्य शेवटी असल्याने त्यांच्याकडून काम केंव्हा होईल याबाबत खात्री नाही. वरद गणेश ते सावरकर रस्ता हा अत्यंत खराब झालेला असून रस्त्यात खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे रस्त्याच्या मजबुतीकरणाचे / डांबरीकरणाचे काम त्वरीत हाती घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावित कामा करिता सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात रू.२० लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक रू.२४,८९,२२१/- असून या करिता रू.५.० लाखाची तरतुद हि त्याच प्रभागातील प्रभाग क्र.३५ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी पान क्र.१३२ अ.क्र.६१ वर रक्कम रू.५.० लक्ष तरतुद वळती करण्यात आलेली आहे.

रस्ता अत्यंत खराब झाल्याने व रस्त्याची दुरूस्ती तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पत्र पाठवून कळविण्यात आले होते की, महानगरपालिकेतर्फे रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात येईल. व तेवढी रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून गृहीत धरण्यात येईल. परंतु एम.एस.आर.डी.ने मान्य केलेले नाही.

तरी वरील पार्श्वभुमी लक्षात घेवून कामाचे अंदाज पत्रक रू.२४,८९,२२१/- मंजूरी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरदगणेश ते सावरकर चौकापर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे, या कामाचे र.रू.२४,८९,२२१/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शिवाजी महाराज पुतळा (एन-२ सिडको) ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे खडीकरण करणे व डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००३-२००४ दर पत्रकाप्रमाणे तयार करण्यांत आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रूपये ३०,५३,०८५/- चे आहे.

सदरील रस्ता हा मनपा हद्दीत असून सदर रस्ता सिडको प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रातून वगळलेल्या भागात येतो. सदर भागाचा नव्याने डि.पी. करणे काम सुरू आहे.

या नियोजित रस्त्याच्या दोन्ही बाजुस अनाधिकृतपणे वसाहती विकसीत झालेल्या असुन सध्या जागेवर सरासरी १८ मीटर एवढ्या रूंदीचा रस्ता उपलब्ध आहे.

या रस्त्याच्या विकास करण्याबाबत, उपसंचालक नगर रचना औरंगाबाद विभाग यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यांच्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, अनाधिकृत वसाहतीत बांधकामे नियमित करतांना सिडको अधिसुचित क्षेत्रातुन येणाऱ्या आजुबाजूच्या सर्व रस्त्यांचे समन्वय साधन्याच्या दृष्टीने गुंठेवारी विकास २००१ कार्यालयाअंतर्गत बांधकामे नियमाकुल करते वेळी आवश्यक ते रूंदीकरण प्रस्तावित करणे संयुक्तीक होईल.

उपरोक्त अभिप्रायानुसार अस्तित्वातील २४ मीटर रूंद रस्त्याशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने प्रस्तावित कामाचे अं.प.तयार करण्यात आलेले असुन, सध्या उपलब्ध १८ मीटर रूंद रस्त्याचे बांधकाम करण्याचा समावेश अंदाजपत्रकात आहे. भविष्यात सदर रस्त्याचे रूंदीकरण करावे लागेल.

आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत सदर रस्त्याच्या खडीकरणाचे व डांबरीकरणाचे (रूंदी ४ मीटर) काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सध्या चालू आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या या रस्त्यालगत असलेल्या दोन्ही बाजुस ६ मीटर रूंदीचे खडीकरण व सरफेस ड्रेसिंग करून रस्त्याच्या दोन्ही बाजूस कॉक्रींट गटार बांधण्याचे काम प्रस्तावित केलेले आहे. मंजूरी मिळाल्यास सदर रस्त्याच्या रूंदीकरण,खडीकरण व सरफेस ड्रेसिंगचे काम करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शिवाजी महाराज पुतळा (एन-२ सिडको) ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन रस्त्याचे खडीकरण करणे व डांबरीकरण करणे, या कामाचे रक्कम रूपये ३०,५३,०८५/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/४ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील २० खाटी रूग्णालय विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००२-२००३ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.३१,३२०००/- चे अंदाजपत्रक तयार केले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.०९.१२.२००४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अ.क्र.२, १६ पान क्र.११५ वर रक्कम रूपये १२.०० लक्ष तरतूद ठेवण्यात आलेली आहे. व उर्वरित खर्च पूढील आर्थिक वर्षी करण्यात येईल.

करिता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३१,३२०००/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील २० खाटी रूग्णालय विकसित करणेच्या कामाचे रक्कम रू.३१,३२०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/५ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरगाबाद प्रस्ताव सादर करतात की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्र.टि.पी.एस.-४१०३/६५/प्रक्र.३०/२००३/नवि-३० दिनांक २० ऑगस्ट २००३ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये निदेश दिले आहेत की,

'' औरंगाबाद शहराची वाढीव क्षेत्र अधिक नाविकास विभागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, क्र.टि.पी.एस.३०८८ /४५४/प्र.क्र.५९/८८/नवि-१२, दिनांक १५ ऑक्टोबर १९९१ नुसार मंजूर करण्यात आली असून ती दिनांक १९ नोव्हेबंर १९९१ पासून अंमलात आली आहे.

या विकास योजनेतील गट क्र.२६५ (भाग) मधील सुमारे ०.४१ हेक्टर क्षेत्र नाविकास विभागात समाविष्ट असून भगवान प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित श्री.बबनराव ढाकणे कनिष्ठ महाविद्यालय, चिकलठाणा यांनी उक्त क्षेत्र नाविकास विभागातून वगळून शैक्षणिक विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याची विनंती शासनास केली आहे. त्यानुसार शासनाने उक्त विकास योजनेतील उक्त क्षेत्र नाविकास विभागातुन वगळून भगवान प्रतिष्ठान औरंगाबाद संचलित श्री.बबनराव ढाकणे कनिष्ट महाविद्यालय (कला/वाणिज्य) चिकलठाणा औरंगाबाद करिता शैक्षणिक वापरासाठी निर्देशित करणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ च्या तरतुदीचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करावा.''

या प्रकरणी संबंधित मिळकत गट नंबर २६५ क्षेत्र ०.४१ हेक्टर चिकलठाणा ही औरंगाबाद जालना रस्त्यापासून उत्तरेला सुमारे ९०.०० मी. अंतरावर स्थित असून सदर मिळकतीस आज मितीस अधिकृत पोच रस्ता उपलब्ध नाही. करिता उक्त कार्यवाही सोबतच औरंगाबाद जालना रस्त्यापसून मिळकतीच्या हद्दीपर्यंत १२.०० मी. रूंद रस्त्याचे नियोजन करणे क्रमप्राप्त आहे.

करिता शासनाने निदेशीत केल्यानुसार उक्त उल्लेखित मिळकत व प्रस्तावित १२.०० मी. रूंद रस्ता यांचा भाग नकाशा सोबत सुलभ संदर्भाकरिता सादर करण्यात येत आहे.

या प्रकरणी अत्यावश्यक कार्यवाही म्हणून उक्त उल्लेखित महाविद्यालयाचे प्राचार्यांनी नोटरीकृत हमीपत्र सादर केले आहे. सादर हमी पत्रानुसार,

१. फेरबदलाच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असणारा किमान १२.०० मी.रूंदीच्या नियोजित पोच रस्त्यासाठी भू-संपादन करणे, सदर रस्त्याचा सर्वकंश विकास करणे यासाठीच्या आवश्यक निधीची तरतूद संस्था स्वखर्चाने करेल, या प्रकरणी महापालिकेस कुठल्याही प्रकारे आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता राहणार नाही.

२. फेरबदलास शासनाची मान्यता झाल्यानंतर उक्त नमुद जागेत असणारे कच्च्या स्वरूपाचे बांधकाम निष्कासित करून महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार व विकास नियंत्रण नियमावली नुसार परिपूर्ण प्रस्ताव मान्यतेस्तव महानगरपालिकेकडे सादर करील व त्यासाठी आवश्यक शहर विकास निधी, विकास खर्च,जमिन विकास शुल्काचा भरणा करणे संस्थेस बंधनकारक राहील. व या व्यतिरिक्त सर्व आवश्यक कार्यवाहीस संस्था महानगरपालिकेच्या धोरणानुसार बांधिल राहील. अशी हमी लिहून दिली आहे. करिता,

'' गट नंबर २६५ चिकलठाणा भागश: क्षेत्र ०.४१ हेक्टर नाविकास विभागातून वगळून भगवान प्रतिष्ठान औरंगाबाद संचलित श्री.बबनराव ढाकणे कनिष्ठ महाविद्यालय (कला/वाणिज्य) करिता शैक्षणिक वापरासाठी निर्देशित करणे तसेच या क्षेत्रासाठी औरंगाबाद-जालना रस्त्यापासून १२.०० मी.रूंदीचा पोच रस्ता नियोजित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची पुढील कार्यवाही करण्यासाठी मा.आयुक्तांना पुढील सर्व अधिकार प्रदान करण्यांत यावेत.''

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गट नंबर २६५ चिकलठाणा भागश: क्षेत्र ०.४१ हेक्टर नाविकास विभागातून वगळून भगवान प्रतिष्ठान औरंगाबाद संचलित श्री.बबनराव ढाकणे कनिष्ठ महाविद्यालय (कला/वाणिज्य) करिता शैक्षणिक वापरासाठी निर्देशित करणे तसेच या क्षेत्रासाठी औरंगाबाद-जालना रस्त्यापासून १२.०० मी.रूंदीचा पोच रस्ता नियोजित करणेसाठी प्रस्तावातील अट क्र.१ व २ ला अधिन राहून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास व ही कार्यवाही करण्यासाठी सूचना/हरकती मागविणे,सुनावणी घेणे व परिपूर्ण

प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ५१८/ १ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक २०.०१.२००४ चे विषय क्र.२५२/१६ अन्वये नगर सचिव या पदासाठी वेतनश्रेणी रू.१०,६५० ते १५,८०० देण्यास दिनांक ०१.०१.२००४ पासून शासनाची मंजूरी मिळेपर्यंत थकबाकीची रक्कम देय होणार नाही यास अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

२००५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकानंतर पालिका सदस्यांची संख्या ९८+५ = १०३ इतकी होणार असून कामाचा व्यापही वाढेल. विविध सभांची कामे कालमर्यादेत करावी लागतात. त्यासाठी सुट्टीच्या दिवशी आणि कार्यालयीन वेळेपूर्वी व नंतरही कामे करावी लागतात. पुणे महानगरपालिकेत नगर सचिव यांना रू.९००/- प्रतिमहा इतके विशेष वेतन देण्यात येते. तरी औरंगाबाद महानगरपालिकेचे सचिव यांना यापूर्वीही सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्याप्रमाणे दिनांक ०१.०१.२००४ पासून सुधारीत वेतनश्रेणी रू.१०६५० ते १५८०० यासह विशेष वेतन रू.९००/- प्रतिमहा देण्यास मान्यता होणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.किशनचंद तनवाणी, श्री.मिर हिदायत अली, श्री.राधाकृष्ण गायकवाड,श्री.नंदकुमार फुलारी, श्री.सुरजितसिंग खुंगर, श्री.काशिनाथ कोकाटे.

अनुमोदक : सौ.साधना सुरडकर, श्री.नंदकुमार घोडेले, श्री.भागवत कराड, श्री.संजय शिरसाठ श्री.भगवान घडमोडे, श्री.जावेद कुरैशी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दि.२०.०१.२००४ विषय क्र.२५२/१६ अन्वये नगरसचिव पदासाठी दिनांक ०१.०१.२००४ पासून शासनाची मंजूरी मिळेपर्यंत थकबाकीची रक्कम देय होणार नाही यास अधिन राहून रू.१०६५० ते १५८०० ही वेतनश्रेणी दि.०१.०१.२००४ पासून लागू करण्यास मान्यता दिलेली आहे.

पुणे महानगरपालिकेत नगरसचिव यांना रू.९००/- प्रती महा विषेश वेतन देण्यांत येते, त्यानूसार प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे नगर सचिव यांना रू.९००/- विषेश वेतन आणि दिनांक ०१.०१.२००४ पासून सुधारित वेतनश्रेणी रू.१०६५० ते १५८०० लागू करण्यास याद्वारे स्वंतत्ररित्या पुनश्च: सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/ २ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.४५ मधील एन-११ महानगरपालिकेचा दवाखान्यास ''कै.शरदभाऊ कुलकर्णी हॉस्पीटल '' असे नांव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे

अनुमोदक : १.सौ.साधना सुरडकर, २.सौ.जयश्री कुलकर्णी,३.श्री.मिर हिदायत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.४५ मधील एन-११ येथील महानगरपालिकेच्या दवाखान्यास ''कै.शरदभाऊ कुलकर्णी हॉस्पीटल '' असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७६ कैसर कॉलनी वार्डासाठी चालू आर्थिक वर्षात कैसर कॉलनी वार्डासाठी पुनर्डांबरीकरण ची तरतूद १४ लाख रू.मध्ये रू.१२ लाख चे काम मंजूर आहे.

परंतू उरलेल्या शिल्लक रू.२ लाख मधून कैसर कॉलनी वार्डात विविध कॉलनी मध्ये उर्वरीत ठिकाणच्या रस्त्याच्या डांबरीकरण करणे फार जरूरी अत्यावश्यक आहे.

करीता रू.दोन लाखचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलिम पटेल अनुमोदक : श्री.कैसरखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७६ कैसर कॉलनी वार्डासाठी चालू आर्थिक वर्षात कैसर कॉलनी वार्डातील पुनर्डांबरीकरणाच्या उरलेल्या शिल्लक रू.२ लाख रकमे मध्ये कैसर कॉलनी वार्डात विविध कॉलनी मध्ये उर्वरीत ठिकाणच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ५२१/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ५ अन्वये सर्वसाधारण सभेत वेळोवेळी पारित झालेला ठराव आहेत.

न्यु नंदनवन कॉलनी, अभिनंदन कॉलनी, भूजबळ नगर इत्यादी वसाहती कडे पोच रस्ता उपलब्ध नसल्यामूळे तेथील नागरिक लष्कर खात्याच्या जमिनीमधून ये-जा करतात. या रस्त्याच्या जागेची भूसंपादनाची रक्कम सन २००१ मध्ये रूपये १४,७९,३३३/- लष्कर खात्यास अदा करणेसाठी संदर्भ क्र.१ नुसार ठराव पारित झालेला आहे. सदर रक्कम अदाईचे प्रकरण तेंव्हापासून कार्यालयीन कार्यवाही अंतर्गत आहे.

कालंतराने या रस्त्याच्या जमिनीच्या मोबदल्याची रक्कम लष्कर खात्याच्या नवीन दरानुसार सन २००३ मध्ये रूपये १९,३३,८००/- झाली आहे. ही रक्कम त्या भागातील भुखंड धारकाकडून वसुल करून लष्कर खात्याकडे भरणा करणेचा ठराव संदर्भ क्र.२ नुसार पारित झाला आहे.

त्यानंतरच्या सर्वसाधारण सभेत संदर्भ क्र.३ नुसार असा ठराव पारित झाला आहे की, २८२ मीटर लांबीच्या पोच रस्त्यासाठी जागा संपादन करून लष्कर खात्यास नवीन दराप्रमाणे रक्कम रूपये १९,३३,८००/- मनपा फंडातून अदा करावी व गुंठेवारी अंतर्गत त्याच भागातील नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून समायोजन करावे.

त्या नंतरच्या सर्वसाधारण सभेत संदर्भ क्र.४ अन्वये संदर्भ क्र.३ ठराव क्र.३१८/२ वगळण्यात आला. लगेच त्यानंतरच्या सर्वसाधारण सभेत संदर्भ क्र.५ अन्वये मागील सभांच्या इतिवृत्तांसह संदर्भ क्र.३ चा ठराव क्र.३१८/२ पून्हा कायम करण्यात आला.

प्रस्तावित रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रश्न हा सन २००१ पूर्वी पासूनचा असून गुंठेवारी अधिनियम २००१ हा दिनांक ३० एप्रिल २००१ पासून अंमलात आलेला आहे. सदरील रस्ता हा नंदनवन कॉलनीतील १५.० मीटर रूंद पुर्व-पश्चिम विद्यमान रस्त्यास समन्वय साधण्याचे दृष्टीकोनातून भूसंपादन करणे आवश्यक आहे. गुंठेवारी अधिनियम २००१ चे कलम-६ अन्वये अनधिकृत वसाहतींचे नियमीतीकरणातून जमा होणारी रक्कम ही त्या त्या वसाहती मधील विकास कामे (सुविधा पुरविणे) करण्यासाठीच त्या त्या प्रमाणात वापरण्याचे असून सदरील रक्कम ही '' भूसंपादनासाठी वापरणे अपेक्षित दिसून येत नाहीत '' त्यामूळे गुंठेवारी विकासाचे नियमीतीकरणातून प्राप्त होणारी रक्कम ही भूसंपादनाचे कामी वापरता येणार नाही. तेंव्हा भूसंपादनासाठीची वरील रक्कम रूपये १९,३३,८००/- (रूपये एकोणीस लक्ष तेहतीस हजार आठशे फक्त) ही महानगरपालिका फंडातून अदा करणे संयुक्तीक होईल त्या अनुषंगाने दिनांक १९.०६.२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ८८/६ चे ठरावामध्ये या प्रमाणे दुरूस्ती होण्यासाठी तसेच रस्त्याच्या जमिनीचा मोबदला रक्कम रूपये १९,३३,८००/- लष्कर खात्यास अदा करणेसाठी विचारविनिमय करून निर्णयास्तव सादर.

श्री.किशनचंद तनवाणी : ऐनवेळचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,न्यु नंदनवन कॉलनी, अभिनंदन कॉलनी, भूजबळ नगर इत्यादी वसाहती कडे पोच रस्ता उपलब्ध नसल्यामूळे तेथील नागरिक लष्कर खात्याच्या जमिनीमधून ये-जा करतात. रस्त्याच्या जमिनीच्या मोबदल्याची रक्कम लष्कर खात्याला अदा करण्यास यापूर्वी सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. त्याच अनुषंगाने आता प्रस्तावात नमूद केलेल्या विविध ठरावात दुरूस्ती करून भूसंपादनासाठी लागणारी रक्कम रू.१९,३३,८००/- महानगरपालिका फंडातून अदा करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/२ :**

दिनांक ५.१.२००५ ते ९.१.२००५ या कालावधीत औरंगाबाद येथे स्त्री रोग तज्ञांची अखिल भारतीय परिषद आयोजित करण्यात आलेली आहे. या परिषदेसाठी ५००० स्त्री रोग तज्ञ डॉक्टर्स, आरोग्यरक्षक व औषध कंपन्यांचा सहभाग आहे. ऑल इंडिया कॉंग्रेस ऑफ ऑब्स्ट्रेटीक्स अँड गायनॉकॉलॉजी या परिषदेच्या संयोजक सचिव डॉ.कानन येळीकर यांनी परिषदेसाठी महानगरपालिकेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. तसेच स्वागतापित्यर्थ प्रिती भोजन महानगरपालिकेने द्यावे अशी विनंती केलेली आहे. यासाठी अंदाजे २,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे कळविलेले आहे.

करीता या परिषदेसाठी महानगरपालिकेतर्फे स्वागतापित्यर्थ प्रिती भोजन देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले, श्री.आनंद तांदुळवाडीकर

अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.मीर हिदायत अली

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : ऐनवेळचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ५.१.२००५ ते ९.१.२००५ या कालावधीत औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आलेली स्त्री रोग तज्ञांची अखिल भारतीय परिषदेसाठी स्वागतापित्यर्थ प्रिती भोजन देणेस व यासाठी येणाऱ्या अंदाजे र.रू. २,००,०००/- अपेक्षित खर्चास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.